## बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. १९ नोव्हेंबर २०२२

### जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६२१/२०२२ भादंविसक ४२०,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०९/१०/२०२२ रोजी सायंकाळी १७.०० वा ते दि. १०/१०/२०२२ रोजी पहाटे ०३.१५ वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, फिर्यादीचे मोबाईलवर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/११/२०२२ रोजी १४.२५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विजयकुमार पांडुरंग साळुंके, वय- ६४ वर्षे, व्यवसाय- लावण्यखणी निर्माता व वितरक, रा. १०/२, भवानी पेठ, केशर पांडुरंग बंगला, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मोबाईल क्रं. ९१६८६६३८९५ चा धारक आयपीएस हनिफ शेख, २) मोबाईल क्रं. ९८५००५८४८८ चा धारक अनिकेत, ३) मोबाईल क्रं. ९५२९९३४७३८ चा धारक इलियास अन्सारी, ४) मोबाईल क्रं. ९५७९३५१२७९ चा धारक सुनिल |
| **फसवणुक र** | : | ४५,०००/- रुपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे घरी असताना फिर्यादीच्या मोबाईल क्रमांकावर आरोपीत क्रं. ३ याचा फोन आला व त्याने फिर्यादीस सांगितले की, मी पिरवाडी, निपाणी जिल्हा- बेळगाव, राज्य- कर्नाटक, वरुन बोलत असल्याचे सांगुन आरोपीत क्रं. १ यांचा तुम्हाला फोन येईल असे सांगुन, आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस फोन करुन फिर्यादीकडुन लावण्यखणी कार्यक्रमाची संपुर्ण माहिती घेवून फिर्यादीचा विश्वास संपादन करुन दि. १०/१०/२०२२ रोजी कार्यक्रमाची तारीख ठरवुन तुमच्या कार्यक्रमाचे १,११,०००/- रु मानधन व तुमच्या कार्यक्रमात माझा अनिकेत नावाचा पाहुणा कलाकार काम करणार आहे त्याचे ४,५०,०००/- रु मानधन ठरवुन जी एस टी व टी डी एस सह ६,००,०००/- रुपये होतात. त्यापैकी ३,००,०००/- रु मी तुम्हाला ॲडव्हान्स मध्ये पाठवितो असे म्हणून फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीच्या व्हाटस अप वर ॲडव्हान्स जमा केल्याचा खोटा मेसेज टाईप करुन पाठविला. त्यानंतर आरोपीत क्रं. २ हा फिर्यादीस ॲडव्हान्स साठी वारंवार फोन करुन त्यांची अडचण सांगुन विनंती करुन फिर्यादी कडुन प्रयोगासाठी त्याचे मानधनातुन काही रक्कम मला पाठवा असे सांगितल्याने फिर्यादीने त्यांचे फोन पे वरुन क्यु आर कोड स्कॅन करुन ३५,०००/- रु व दि. १०/१०/२०२२ रोजी पहाटे ०३.१५ वा चे सुमारास, १०,०००/- रु असे एकुण - ४५,०००/- रु पाठविले. परंतु फिर्यादीस ॲडव्हान्स जमा होण्याबाबत शंका वाटत असल्याने फिर्यादीची फसवणुक होत असल्याचे फिर्यादीचे लक्षात आल्याने फिर्यादी यांनी वरील आरोपीतांविरुध्द तक्रार अर्ज दिला आहे. तरी यातील वरील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीस तुमच्या कार्यक्रमाचा ॲडव्हान्स पाठवितो असे भासवुन फिर्यादीची ४५,०००/- रु ची फसवणुक केली आहे. तपास:- सपोनि- पवार- **९८८१९०२६२४** |